:: **नियमित फौजदारी खटला क्र. १२६/२०२० मधील निशाणी क्र. २९ ते ३१ वरील एकत्रित आदेश** ::

आरोपी क्र. २ ने निशाणी क्र. २९ वर स्वतःला वैयक्तीक हजर राहण्यापासून सूट मिळावी, आरोपी क्र. १ ने निशाणी क्र. ३० वर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१७ प्रमाणे त्याला न्यायालयात हजर राहण्यापासून सूट मिळावी, तसेच निशाणी क्र. ३१ वर आरोपी क्र. ३ ने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०५ प्रमाणे अर्ज सादर करुन त्याची गैरहजेरी माफ करावी असे म्हटले आहे.

०२. विशेष सरकारी वकील श्री. घरत यांनी सर्व तिन्ही अर्जांना खुलासा सादर करुन तीव्र आक्षेप घेतलेला आहे. त्यानंतर मी उभय पक्षांचा युक्तीवाद या तिन्ही अर्जांवर सविस्तर ऐकून घेतला. त्यानंतर एक बाब समोर आली की, विशेष सरकारी वकील श्री. घरत यांनी दि. २५/०१/२०२१ रोजी मा. सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग येथे ग्वाही दिली की, ते दि. ०६/०२/२०२१ रोजी या न्यायालयात आरोपी क्र. ३ विरुद्ध कोणतेही पाऊल उचलणार नाहीत किंवा त्याने हजर राहावे म्हणून तजवीज करणार नाहीत. सदरचे प्रकरण आज रोजी कमीट करण्याच्या टप्प्यावर नेमलेले आहे. त्यासाठी खटल्यातील सर्व आरोपींनी न्यायालयात व्यक्तीशः हजर राहणे आवश्यक आहे. परंतु, आरोपी क्र. ३ बद्दल विशेष सरकारी वकील यांनी मा. सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग येथे दिलेल्या ग्वाहीमुळे उर्वरीत आरोपींना न्यायालयात उपस्थितीसाठी आग्रह धरणे न्यायोचित होणार नाही. ही बाब लक्षात आल्यामुळे विशेष सरकारी वकील श्री. घरत यांनी

निशाणी क्र. ३५ कडे पुरशिस सादर करुन आज रोजी ते तिन्ही आरोपींच्या उपस्थितीसाठी आग्रह धरत नाही असे म्हटले आहे. परंतु पुढील दि. १०/०३/२०२१ रोजी सर्व आरोपींना व्यक्तीशः हजर राहण्याची कडक समज देण्यात यावी असे ते म्हणतात. या पुरशिसमध्ये तिन्ही आरोपींचे वकील तसेच विशेष सरकारी वकील यांच्या सोयीनुसार व संमतीने दि. १०/०३/२०२१ ही पुढील दिनांक नेमलेली आहे.

०३. उभय पक्षांचा युक्तीवाद चालू असताना समोर आलेली वस्तुस्थिती लक्षात घेता आज रोजी वरील तिन्ही अर्जांवर गुणात्मकतेवर आदेश करणे योग्य होणार नाही. वरील निशाणी क्र. ३५ वरील पुरशिस लक्षात घेता, हे तिन्ही अर्ज केवळ दाखल करुन घेणे योग्य होईल. त्या अनुषंगाने तिन्ही आरोपींना न्यायालयात वैयक्तीक उपस्थितीसाठी आज रोजी आग्रह न करता पुढील तारखेस हजर राहण्याची ताकीद देणेही गरजेचे आहे. सबब, वरील चर्चेच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. निशाणी क्र. २९ ते ३१ कडील अर्ज हे केवळ दाखल करुन घेतले.

०२. आरोपी क्र. १ ते ३ यांना याद्वारे आदेश देण्यात येतो की, त्यांनी पुढील दि. १०/०३/२०२१ रोजी या न्यायालयात सकाळी ११.०० वाजता न चुकता व्यक्तीशः हजर राहावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Sunayana Sachinkumar Pingale
Date: 2021.02.06 16:35:52 +0530

अलिबाग. **(सौ. सुनयना स. पिंगळे)**

दिनांक : ०६/०२/२०२१ मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.